# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

प्रतिवर्षी **नाटककार गो. ब. देवल** यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १४ जून रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी १४ जून पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन नाट्य परिषदेच्या यशवंत नाट्यमंदिरात करण्यात आले. त्यावेळी **मा. श्री. मदन गडकरी आणि मा. श्रीमती लीला मेहता** यांना जीवन गौरव पुरस्कार तसेच अनेक नामवंत कलावंताचे पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी कलावंत मेळाव्यात प्रथमच नाट्यपरिषदेच्या सर्व शाखांना कार्यक्रम सादर करण्यास सांगितले होते. त्याला शाखांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. एकूण बावीस शाखांनी आपले कार्यक्रम सादर केले.

## नाट्य कार्यशाळा

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे प्रथमच शनिवार, दिनांक १५ जून २०१३ ते सोमवार, दिनांक १ जुलै २०१३ या कालावधीत नाट्यकार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेच्या संचालक म्हणून **श्रीमती विद्या पटवर्धन** यांनी काम पाहिले. कार्यशाळेत एकूण ५४ मुलांनी सहभाग घेतला होता. **श्री. कमलाकर नाडकर्णी, श्री. अशोक पत्की, श्री. किशोर कदम, श्री. संभाजी भगत, श्री. सचिन गोताड, श्री. प्रकाश निमकर, श्रीमती सोनिया परचुरे, श्रीमती प्रतिमा दातार, श्री. अतुल परचुरे, श्री. रत्नाकर मतकरी, श्रीमती मीना कर्णिक, श्री. देवेंद्र पेम, श्री. सुमीत राघवन, श्रीमती चिन्मयी सुर्वे - राघवन, श्री. मयुर वैद्य, श्री. सचिन खेडेकर, श्री. सुनिल बर्वे, श्रीमती निलीमा दामले, श्री. राजन ताम्हाणे, श्रीमती सुलभा देशपांडे, श्री. जयंत पवार आणि श्री. संतोष वेरूळकर** यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेनंतरही कार्यशाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली एकांकिका नाट्य परिषदेतर्फे बसविण्यात आली व नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेत सदर एकांकिका सादर करण्यात आली.

## शाखा कार्यशाळा

दिनांक १ सप्टेंबर २०१३ रोजी दुपारी १२ ते सायं. ५ यावेळेत नाट्यपरिषदेच्या शाखांच्या पदाधिकाऱ्यांसाठी मध्यवर्तीतर्फे प्रथमच कार्यशाळा घेण्यात आली. नाट्यपरिषदेच्या एकूण ५३ शाखांपैकी ३२ शाखांचे एकूण १५० पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेत शाखेचे वार्षिक जमाखर्च, वार्षिक कार्यक्रम व अहवाल यात नियमितता येण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास श्री. गुरुनाथ दळवी, श्री. चंद्रकांत येडूरकर, श्री. कृष्णा जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

## कै. वसंत जाधव एकांकिका स्पर्धा

नाट्यपरिषदेचे निरलस कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नाटककार 'कै वसंत जाधव' यांच्या स्मरणार्थ या वर्षापासून नाट्यपरिषदेने 'कै. वसंत जाधव खुली एकांकिका स्पर्धा' मुंबई येथे आयोजित केली. त्याला उदंड प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी ५३ संस्थांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक ६ व ७ ऑगस्ट २०१३ रोजी ठाणे केंद्रावर, दिनांक ८ व ९ ऑगस्ट २०१३ रोजी बोरिवली केंद्रावर आणि दिनांक ११, १२ आणि १३ ऑगस्ट २०१३ रोजी मुंबई केंद्रावर संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून ठाणे केंद्रावर श्री. वामन तावडे आणि श्री. विलास गुर्जर, बोरिवली केंद्रावर श्री. रविंद्र बेर्डे आणि श्याम अधटराव आणि मुंबई केंद्रावर श्री. संभाजी सावंत आणि भरत तांडेल यांनी काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी २२ आणि २३ ऑगस्ट २०१३ रोजी यशवंत नाट्यमंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीमध्ये एकूण ११ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील एकांकिकांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.